(इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद )

मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या अधिकारितेतील

दिवाणी अपिलीय अधिकारिता

रिट याचिका क्रमांक – १६८८/२०१०

तानाजी मधुकर बरबडे .......... याचिकाकर्ता

वि.

महाराष्ट्र राज्य आणि इतर .......... उत्तरवादी

श्री. जी. एन. साळुंखे - याचिकाकर्त्याकरिता

श्री. एस. आर. नरगोलकर, अतिरिक्त सरकारी वकिल राज्याकरिता

न्यायमंच - न्या. डी. के. देशमुख,

न्या. अनुप व्ही. मोहता आणि

न्या. रणजित मोरे

दिनांक : २६ ऑक्टोबर, २०१०.

न्यायनिर्णय : (न्या. डी. के. देशमुख यांच्याद्वारे)

१. दोन प्रश्न जे आमच्याकडे निर्णयासाठी पाठवले गेले आहेत, ते असे आहेत की, (i) एम.ई.पी.एस. कायदा आणि त्याअंतर्गत तयार केलेल्या नियमांमधील तरतुदी लक्षात

घेता, दिनांक १५ एप्रिल, १९९१ चा शासन निर्णय वैध आहे का? आणि (ii) अधिनियमांतर्गत निर्गमित केलेल्या नियमाच्या अनुसूचि 'एफ' मध्ये पदोन्नतीची तरतूद आहे कि नियुक्तीमध्ये केवळ प्राधान्य देण्याची तरतूद आहे ?

२. हे प्रश्न पुढील वस्तुस्थितीविषयक पार्श्वभूमीवर उद्भवतात.

उत्तरवादी क्रमांक ४ - श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ यांनी बार्शी येथे कनिष्ठ महाविद्यालयाची स्थापना केली आहे. आमच्या पुढे मान्य केलेली परिस्थिती अशी आहे की, सदर कनिष्ठ महाविद्यालय हे महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, १९७७ (यापुढे "कायदा" म्हणून संदर्भित) च्या अर्थानुसार एक खासगी शाळा आहे. याचिकाकर्त्याची दिनांक २९ एप्रिल, १९९४ पासून उत्तरवादी क्रमांक ५ - कनिष्ठ महाविद्यालयात शिपाई म्हणून नियुक्ती करण्यात आलेली होती. ऑगस्ट, २००३ मध्ये सदर महाविद्यालयातील कनिष्ठ लिपिकचे पद रिक्त झाले. दिनांक ३१ मार्च, २००८ च्या आदेशान्वये उत्तरवादी क्रमांक ४ यांनी याचिकाकर्त्यास दिनांक १/४/२००८ पासून कनिष्ठ लिपिक या पदावर पदोन्नती दिली. याचिकाकर्ता दिनांक १/४/२००८ रोजी सदर पदावर रुजू झाले. उत्तरवादी क्रमांक ४ आणि ५ यांनी दिनांक ५/४/२००८ रोजी याचिकाकर्त्याला कनिष्ठ लिपीक या पदावर पदोन्नती देण्याच्या मंजुरीसाठी उत्तरवादी क्रमांक २ यांचेकडे प्रस्ताव सादर केला. दिनांक ६ जून, २००८ च्या पत्रान्वये उपसंचालक, शिक्षण यांनी उत्तरवादी क्रमांक ५ यांना असे कळविले की, कायद्यानुसार कनिष्ठ लिपिक हे पद पदोन्नतीने नव्हे तर थेट भरतीद्वारे भरावयाचे आहे आणि त्यामुळेच

ज्या आदेशाद्वारे याचिकाकर्त्याला पदोन्नती देण्यात आली आहे, त्यास मान्यता देता येणार नाही. येथे हे निदर्शनास आणून दिले जाऊ शकते की, उत्तरवादी क्रमांक ४ आणि ५ यांना याचिकाकर्त्याच्या कनिष्ठ लिपिक पदावर पदोन्नतीसाठी उत्तरवादी क्रमांक २ ची मंजुरी घेण्याचे कारण उध्दभवते, कारण उत्तरवादी क्रमांक ५ - महाविद्यालयास राज्य सरकारकडून सहायक अनुदान मिळते.

३. याचिकाकर्त्याने, उपसंचालकांनी याचिकाकर्त्याला कनिष्ठ लिपिक पदावर पदोन्नती देण्यासाठी मान्यता करण्यास नकार देण्याच्या आदेशामुळे व्यथित होऊन, रिट याचिका क्रमांक १६८८/२०१० दाखल केली. सदर रिट याचिका ही दिनांक ११ मार्च, २०१० रोजी स्वीकृतीसाठी या न्यायालयाच्या खंडपीठासमोर आली.

४. याचिकाकर्त्याला कनिष्ठ लिपिक या पदावर पदोन्नती न देण्याचे उपसंचालकांनी दिलेले कारण योग्य नाही, या त्यांच्या युक्तिवादाच्या समर्थनार्थ, याचिकाकर्त्याने दिनांक १५ एप्रिल, १९९१ चा शासन निर्णय आणि अधिनियमांतर्गत तरतूद केलेल्या नियमांच्या अनुसूची ‘एफ’ मधील टिप्पणीवर भिस्त ठेवली. याचिकाकर्त्याने या न्यायालयाच्या खंडपीठाने अशोक शंकरराव शिंदे वि. प्रबोधन शिक्षण संस्था, नागपुर, १९९९ (१) एमएच.एल.जे ३४८ आणि अजून एक प्रकरण म्हणजे रमेश शिवराम खैरनार वि. महाराष्ट्र राज्य आणि इतर, २००३ (४) एमएच.एल.जे. ४७० या दोन प्रकरणांमध्ये दिलेल्या

न्यायनिर्णयांवर भिस्त ठेवली. खंडपीठ, जे रिट याचिका क्रमांक १६८८/२०१० च्या सुनावणीचे कामकाज पाहत होते, त्यांना देखील वरील दोन न्यायनिर्णयांमध्ये नमूद केलेल्या कायद्याशी सहमत होण्यास असमर्थता वाटली आणि म्हणूनच रिट याचिका ही अंतिम सुनावणीसाठी स्वीकारण्यात आली आणि मा. मुख्य न्यायमूर्ती यांना वरील प्रश्न हे मोठ्या खंडपीठांसमोर मांडण्याची विनंती करण्यात आली. त्यानुसार, मा. मुख्य न्यायमूर्ती यांनी वरील दोन प्रश्नांवर विचार करण्यासाठी या खंडपीठाची स्थापना केली आहे.

५. आम्ही दोन्ही बाजूंच्या वतीने उपस्थित असलेल्या विद्वान वकिलांचे म्हणणे ऐकले आहे.

६. याचिकाकर्त्याच्या वतीने उपस्थित असलेल्या वकिलांनी कायद्याच्या तरतुदी, नियम आणि खंडपीठाच्या वरील उपरोक्त दोन न्यायनिर्णयावर भिस्त ठेवली. विद्वान वकिलांनी नि‍ता रमेश दानाने वि. डोंबिवली मित्र मंडळ आणि इतर, २००९ (१) एमएच.एल.जे. ७९७ या प्रकरणामध्ये या न्यायालयाच्या विद्वान एकल न्यायाधीश यांनी पारित केलेल्या न्यायनिर्णयाच्या परिच्छेद १३ मध्ये नोंदवलेल्या निरीक्षणावर देखील भिस्त ठेवली.

७. परंतु, उत्तरवादी क्रमांक १ ते ३ यांच्या वतीने उपस्थित असलेले अतिरिक्त सरकारी वकिल यांनी सादर केले की, वर्ग - ४ संवर्गात कार्यरत असलेल्या व्यक्तीला कनिष्ठ लिपिक पदावर पदोन्नती देणे हे कायदा आणि नियमांच्या योजनेच्या विरुद्ध आहे.

८. आता, पहिला प्रश्न विचारात घेतांना, आम्ही खरोखर काय विचारात घ्यावे लागेल ते म्हणजे कायदा आणि नियमाच्या तरतुदीच्या अर्थाने दिनांक १५ एप्रिल, १९९१ चा शासन निर्णय हा खाजगी शाळेच्या संदर्भात लागू होईल. सदर शासन निर्णयाचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, सदर शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने निर्गमित केलेला आहे. सदर शासन निर्णयाचा विषय वर्ग - ४ च्या कर्मचारी वर्गाची पदोन्नती हा आहे. सदर शासन निर्णयावरून असे दिसून येते की, तो निर्णय केवळ शासकीय सेवेलाच लागू होतो. तो खाजगी शाळेला लागू होत नाही. आमच्या मते, उपरोक्त शासन निर्णयाच्या परिच्छेद ४, ५ आणि ६ मध्ये काही एक शंका नाही की, हा शासन निर्णय केवळ शासकीय सेवेलाच लागू होतो. शासन निर्णयाच्या परिच्छेद ४ मध्ये प्रत्येक विभागाने जिल्हा स्तरावर ज्येष्ठता सूची तयार करावी, असे नमूद केले आहे. परिच्छेद ५ मध्ये असे म्हटले आहे की, चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची संयुक्त ज्येष्ठता सूची तयार करण्याच्या उद्देशाने, प्रत्येक विभागाने जिल्हा स्तरावर एका अधिकाऱ्याची नियुक्ती केली पाहिजे. परिच्छेद ६ मध्ये असे नमूद केले आहे की, जोवर मंत्रालयातील विभागांचा संबंध आहे, प्रत्येक विभागासाठी स्वतंत्र ज्येष्ठता सूची तयार केली जावी. अशाप्रकारे, या शासन निर्णयाच्या भावार्थावरून हे स्पष्ट होते की, तो केवळ

शासकीय सेवेसाठीच लागू होतो. सामान्य प्रशासन विभागाकडून जो शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे, ही वस्तुस्थिती, आमच्या मतानुसार, तो केवळ शासकीय सेवेसाठीच लागू होतो, असे स्पष्टपणे सूचित करते. सदरचा शासन निर्णय हा खाजगी शाळांना लागू होईल असे का म्हणता येणार नाही, याचे आणखी एक कारण आहे. कायद्याचे कलम ५ (१) हे खालीलप्रमाणे वाचावे.

> ५ (१) व्यवस्थापन, खाजगी शाळेतील प्रत्येक स्थायी रिक्त पद, शक्य तितक्या लवकर, विहित करण्यात आलेल्या रितीने अशा रिकाम्या पदासाठी यथोचित अहर्ताप्राप्त व्यक्तींची नेमणूक करून भरील:
> (परंतु, असे रिकामे पद पदोन्नतीद्वारे भरण्यात यावयाचे नसेल तर व्यवस्थापन, असे रिक्त पद भरण्याच्या बाबतीत कार्यवाही करण्यापूर्वी शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई, (शिक्षण अधिकारी, जिल्हा परिषद किंवा यथास्थिती, संचालक किंवा तांत्रिक, व्यावसायिक, कलाविषयक किंवा विशेष शिक्षण देणाऱ्या शाळांच्या संबंधात संचालकांकडून पदनिर्देशित करण्यात येईल असा अधिकारी) यांच्याकडून, त्यांनी अन्य शाळांमध्ये समावेशनाकरिता ठेवलेल्या अतिरिक्त व्यक्तीच्या यादीमधून कोणतीही योग्य व्यक्ती उपलब्ध होण्याजोगी आहे किंवा कसे याची खात्री करून घेईल व अशी कोणतीही व्यक्ती उपलब्ध असेल त्याबाबतीत व्यवस्थापन, त्या व्यक्तीची अशा रिक्त पदावर नेमणूक करील.)

९. वर उद्धृत केलेल्या तरतुदींचे अवलोकन केल्यास हे स्पष्ट होते की, खाजगी शाळेतील रिक्त पद हे विहित पद्धतीने भरावयाचे आहे. “विहित” या शब्दाची व्याख्या कलम २ (१७) मध्ये नियमांद्वारे विहित केलेली असा आहे. आमच्या मते, कलम १६ (२) (डी) हे संबंधित आहे. ते खालीलप्रमाणे वाचावे.

> १६ (२) (डी) रजा, नियतसेवावधी, फेर-नेमणूक व पदोन्नती यांसह अशा कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या इतर शर्ती;

अशाप्रकारे, खाजगी शाळेच्या सेवेत कोणत्या शर्तींवर पदोन्नती द्यायची याची तरतूद करण्यासाठी हा कायदा राज्य सरकारला विशेषतः नियम बनविण्याचे अधिकार प्रदान करतो. आमच्या मते, हे शासन निर्णयाद्वारे खाजगी शाळेतील पदोन्नतीच्या संदर्भात तरतूद करण्याची शक्यता नाकारते. कायद्याचे एक निश्चित तत्त्व आहे की, जेव्हा एखादी गोष्ट विशिष्ट पद्धतीने करण्याची परवानगी दिली जाते तेव्हा, ती फक्त त्याच पद्धतीने केली जाऊ शकते आणि ती गोष्ट करण्याचे इतर सर्व मार्ग हे आवश्यक परिणामंद्वारे प्रतिबंधित आहेत. म्हणून, जेव्हा कायदा स्पष्टपणे अशी अट घालतो की, खाजगी शाळेतील पदोन्नती संदर्भात नियम तयार करून तरतूद केली जाऊ शकते, तेव्हा ती शासन निर्णय निर्गमित करून करता येणार नाही, विशेषतः नियम तयार करण्याच्या अधिकाराचा वापर करून राज्य सरकारने नियम तयार केले आहेत आणि जे खाजगी शाळेतील सेवाप्रवेशासाठी

तरतूद करतात आणि पदोन्नतीद्वारे काही पदे भरण्याची देखील तरतूद करतात. म्हणूनच, आमच्या मते, हे स्पष्ट आहे, की एम.ई.पी.एस. कायदा आणि त्याअंतर्गत तयार केलेले नियम लक्षात घेऊन आणि सदर शासन निर्णयामध्ये जे काही नमूद केले आहे ते लक्षात घेऊन दिनांक १५ एप्रिल, १९९१ रोजीचा शासन निर्णय हा खाजगी शाळांना लागू होत नाही.

१०. याचिकाकर्त्यांनी नियमांच्या अनुसूची “एफ” मध्ये नमूद केलेल्या खालील बाबींवर भिस्त ठेवली.

> निम्नश्रेणी कर्मचारी वर्ग - प्रयोगशाळा परिचर, नाईक, तेलवाला (ऑइलमॅन), यंत्र परिचर, चपराशी, पहारेकरी, चौकीदार, सफाईगार, स्त्री सेवक (कॉल वूमन), कामाठी, परिचर, प्रयोगशाळा, हमाल, उदवाहन चालक आणि असा अन्य निम्नश्रेणी कर्मचारी वर्ग यांची एक संयुक्त ज्येष्ठता सूची त्यांच्या नियुक्तीच्या तारखांच्या आधारे ठेवण्यात येईल. निम्नश्रेणी कर्मचारी वर्गांपैकी कोणत्याही व्यक्तीने एकतर, प्रयोगशाळा सहाय्यक किंवा लिपिक या पदासाठी विहित करण्यात आल्याप्रमाणे, त्याची अर्हता वाढल्यास, अशा कर्मचाऱ्याला उक्त पद भरतेवेळी ज्येष्ठता सूचीमधील त्याच्या क्रमानुसार प्राधान्य देण्यात येईल. (यावर भर देण्यात आला.)

११. याचिकाकर्त्याच्या वतीने असा युक्तिवाद करण्यात आला आहे की, उपरोक्त

उद्धृत तरतुदींमध्ये निम्न श्रेणीतील कर्मचाऱ्यांना कनिष्ठ लिपिक पदावर पदोन्नतीने बढती देण्याची तरतूद आहे. अशोक शिंदे यांच्या खटल्यातील न्यायनिर्णय हा काळाच्या दृष्टीने पहिलाच न्यायनिर्णय आहे. सदर न्यायनिर्णयाने देखील अनुसूची "एफ" मधील उपरोक्त उद्धृत मजकुराच्या काही भागावर भिस्त ठेवली आहे. सदर न्यायनिर्णयावरून असे दिसून येते की, खाजगी शाळेत शिपाई म्हणून काम करणाऱ्या व्यक्तीने आपल्या अर्हतेमध्ये उन्नती केली होती आणि कनिष्ठ लिपिक पदासाठी आवश्यक असणारी अर्हता प्राप्त केली होती. परंतु, व्यवस्थापन हे कनिष्ठ लिपिक पदावर पदोन्नतीसाठी त्याचा विचार करत नव्हते आणि म्हणून त्याने रिट याचिका दाखल केली. त्या प्रकरणातील याचिकाकर्त्याने उपरोक्त अनुसूची "फ" मधील मजकुराच्या काही भागावर भिस्त ठेवत असा दावा केला की, त्याला कनिष्ठ लिपिक पदावर पदोन्नतीसाठी विचारात घेतले जाण्याचा हक्क आहे. खंडपीठाने अनुसूची "एफ" मधील उपरोक्त उद्धृत तरतुदी उद्धृत केल्यावर खालीलप्रमाणे निरीक्षण नोंदविले :

> ५. व्यवस्थापनास असे म्हणण्याचा अधिकार आहे की, अनुसूची अंतर्गत तरतूद केलेले खंड (IV) हे पदोन्नतीबद्दल भाष्य करत नाही. तथापि, संपूर्ण नियमाची योजना त्याअंतर्गत येणाऱ्या अनुसूचींसह एकत्रितपणे वाचन करणे आवश्यक आहे आणि त्यानंतर या दुय्यम कायद्याच्या भागांमध्ये उद्धृत होत असलेल्या आशयाची अर्थउकल केली पाहिजे. हे नियम असल्याने, विधिमंडळ विभागाने कार्यकारी मंडळाला दिलेल्या अधिकारांतर्गत उक्त

कायदा अधिनियमित करताना, त्याअंतर्गत असलेल्या हेतू आणि उपदेशाकडे दुर्लक्ष केले जाऊ शकत नाही.

६. अशाप्रकारे, उपरोक्त दोन तरतुदी एकत्र वाचल्यास, ही स्थिती स्पष्ट होते की, जोवर शिक्षकेतर कर्मचारी, निम्न श्रेणीतील कर्मचारी, शिपाई यांचा संबंध असल्यास, त्यांना प्रयोगशाळा सहाय्यक किंवा लिपिक या पदावर पदोन्नती मिळण्याची शक्यता आहे, जी अनुसूची ब खंड (IV) मध्ये वाचावे लागेल, जे कनिष्ठ लिपिक या पदासाठी नियुक्तीचे स्त्रोत म्हणून संबंधित आहे.

७. त्या प्रमाणात, म्हणून अनुसूची “एफ” स्वतःस अनुसूची ‘ब’ मध्ये प्रक्षेपित करेल आणि एकत्रित वाचन केल्यावर त्यास अर्थ आणि परिणाम दोन्ही द्यावे लागतील. तेव्हाच निम्न श्रेणीतील कर्मचाऱ्यांना उच्च ध्येय ठेवण्यासाठी आणि अधिक चांगले साध्य करण्यासाठी प्रोत्साहित करण्याची मूलभूत कल्पना उद्धृत केली जाऊ शकते आणि सदर उद्दिष्ट प्रगत केले जाऊ शकते.

१२. वर उद्धृत केलेल्या खंडपीठाच्या निरीक्षणावरून हे स्पष्ट होते की, खंडपीठाच्या मतानुसार, जरी अनुसूची “एफ” मधील उपरोक्त उद्धृत मजकुराचा भाग हा “पदोन्नती”

ह्या संज्ञेचा वापर करत नसला तरी, कायद्याची योजना आणि नियम असे दर्शवतात की, सदर तरतूद कनिष्ठ लिपिक या पदावर पदोन्नती नमूद करते. जोवर वर संदर्भित केलेल्या रमेश खैरनार या खटल्यातील न्यायनिर्णयाचा संबंध आहे, त्या प्रकरणात खाजगी शाळेच्या व्यवस्थापनाने कनिष्ठ लिपिक या पदासाठी अर्ज मागवण्यासाठी जाहिरात प्रसिद्ध केली होती. याचिकाकर्ता, जो सदर शाळेत शिपाई म्हणून कार्यरत होता, त्याने सदर जाहिरातीस आव्हान देणारी याचिका दाखल केली आणि दावा केला की, अनुसूची “एफ” मधील उपरोक्त उद्धृत तरतुदी लक्षात घेऊन, त्यास कनिष्ठ लिपिक या पदावर पदोन्नतीसाठी विचारात घेतले जाण्याचा अधिकार आहे आणि त्या पदासाठी जाहिरात प्रसिद्ध करायला नको होती. सदर न्यायनिर्णयाचे अवलोकन करता असे दिसून येते की, प्रामुख्याने वर उल्लेख केलेल्या अशोक शिंदे यांच्या प्रकरणातील निकालामध्ये खंडपीठाने केलेला निरीक्षणांवर भिस्त ठेवून, खंडपीठाने असा निर्णय दिला की, त्या प्रकरणात याचिकाकर्त्याला कनिष्ठ लिपिक या पदावर पदोन्नतीसाठी विचारात घेतले जाण्याचा अधिकार होता आणि असा निर्णय दिला होता की, व्यवस्थापनाने जाहिरात प्रसिद्ध करणे समर्थनीय नव्हते.

१३. अशोक शिंदे यांच्या प्रकरणातील निकालात खंडपीठाने त्यांच्या निकालात कायद्याच्या योजनेचा संदर्भ दिला आहे. कायद्याच्या प्रस्तावनेचे अवलोकन केल्यास असे दिसून येते की, हा कायदा राज्यातील खाजगी शाळांमधील कर्मचाऱ्यांची भरती आणि सेवाशर्तींचे नियमन करण्यासाठी अधिनियमित करण्यात आला आहे. कलम ३ मधील

पोटकलम १ मध्ये असे नमूद केले आहे की, या अधिनियमाच्या तरतुदी महाराष्ट्र राज्यातील सर्व खाजगी शाळांना लागू होतील, मग त्यांना राज्य शासनाकडून कोणतेही सहायक अनुदान मिळत असो किंवा नसो. अधिनियमाच्या कलम ४ मधील पोटकलम १ हे खालीलप्रमाणे वाचावे.

> ४ (१) या कलमाच्या तरतुदींना अधीन राहून राज्य शासनास, खाजगी शाळांमधील कर्मचाऱ्यांच्या सेवाप्रवेशासाठी (त्यांच्या कार्यपद्धतीसह) किमान अर्हता व त्यांची कर्तव्ये, वेतन, भत्ते, सेवानिवृत्तीनंतरचे व इतर लाभ आणि सेवेच्या इतर शर्ती यांची आणि मागासवर्गातील व्यक्तींना पुरेशा संख्येत पदे राखून ठेवण्याची तरतूद करणारे नियम करता येतील.
>
> (परंतु, नेमलेल्या दिनांकास अस्तित्वात असलेल्या खाजगी शाळांच्या सेवेतील कर्मचाऱ्यांच्या वेतनात किंवा अनुपस्थितीची परवानगी, सेवानिवृत्तीचे वय आणि सेवानिवृत्तीनंतरचे लाभ व इतर आर्थिक लाभ यांच्या बाबतीतील त्यांच्या हक्कात अशा कर्मचाऱ्याला अहितकारक होईल अशा प्रकारे बदल केला जाणार नाही.)

१४. अशाप्रकारे, भरती, कर्तव्ये, वेतन, भत्ते आणि इतर बाबींसाठी किमान पात्रता प्रदान करणारे नियम तयार करण्याचे अधिकार राज्य सरकारला देण्यात आले आहेत. कलम ५ च्या पोटकलम १ खाली दिसून येणारे परंतुक हे खालीलप्रमाणे वाचावे.

[परंतु, असे रिकामे पदोन्नतीद्वारे भरण्यात यावयाचे नसेल तर व्यवस्थापन, असे रिकामे पद भरण्याच्या बाबतीत कार्यवाही करण्यापूर्वी शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई [शिक्षण अधिकारी, जिल्हा परिषद किंवा यथास्थिती, संचालक किंवा तांत्रिक, व्यावसायिक, कलाविषयक किंवा विशेष शिक्षण देणाऱ्या शाळांच्या संबंधात संचालकांकडून पदनिर्देशित करण्यात येईल असा अधिकारी] यांच्याकडून, त्यांनी अन्य शाळांमध्ये समावेशनाकरिता ठेवलेल्या अतिरिक्त व्यक्तींच्या यादीमधून कोणतीही योग्य व्यक्ती उपलब्ध होण्याजोगी आहे किंवा कसे याचे खात्री करून घेईल व अशी कोणतीही व्यक्ती उपलब्ध असेल त्याबाबतीत व्यवस्थापन, त्या व्यक्तीची अशा रिक्त पदावर नेमणूक करील.]

१५. या परंतुकाचे अवलोकन केल्यास असे दिसून येते की, पदोन्नतीने भरण्याची परवानगी असलेली पदे वगळता, अर्थातच, कायद्याने किंवा नियमांनुसार पदे भरण्यापूर्वी प्रत्येक शाळेने रिक्त जागांबाबत शिक्षण विभागाला सूचना देणे आवश्यक आहे, जेणेकरून, अतिरिक्त कक्षातील उमेदवारांची नावे शाळेला सामावून घेण्यासाठी कळविता येतील. हा परंतुक नियम २६ च्या तरतुदीसह वाचायचा आहे, जो पद रद्द केल्यामुळे होणाऱ्या कपातीशी संबंधित आहे. या नियमाचे अवलोकन केल्यास असे दिसून येते की, विविध खाजगी शाळांमधील कर्मचारी ज्यांची सेवा विविध कारणांमुळे कमी करण्यात आली आहे, त्यांची नावे शिक्षण विभागाने तयार केलेल्या अतिरिक्त

कक्षात आणि जेव्हा कोणत्याही शाळेत जागा रिक्त असताना दाखल केली जातात. ज्या व्यक्तींची नावे अतिरिक्त कक्षामध्ये समाविष्ट आहेत, त्यांना त्या रिक्त पदांवर सामावून घेण्याची संधी मिळते. अशाप्रकारे, जर व्यवस्थापनास पदोन्नतीद्वारे रिक्त जागा भरण्याची परवानगी दिली गेली असेल तर, पदोन्नतीद्वारे त्या रिक्त जागा भरण्यासाठी कायद्यात किंवा नियमांमध्ये कोणतीही विशिष्ट तरतूद नसली तरी ती कायद्यात समाविष्ट असलेल्या योजनेला आणि अतिरिक्त कर्मचाऱ्यांना सामावून घेण्याच्या नियमांना विफल करेल.

१६. राज्य सरकारने, वर निरीक्षण नोंदविल्याप्रमाणे, नियम तयार केले आहेत. आमच्या मते, नियम ९ चा पोटनियम ३ हा महत्त्वपूर्ण आहे. तो खालीलप्रमाणे वाचावा :

> ९ (३) शिक्षकवर्गीय किंवा शिक्षकेत्तर पदासाठी शाळेत करावयाच्या प्रत्येक नेमणुकीबाबत या नियमात अन्यथा तरतूद करण्यात आली नसेल तर, एरवी नेमणुकीसाठी पात्र असणाऱ्या अशा पदासाठी अर्ज करू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी आपले नाव, पत्ता, जन्मतारीख, शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, अनुभव इत्यादी संबंधातील सविस्तर तपशील देऊन लेखी अर्ज करावा आणि त्यासोबत मूळ प्रमाणपत्राच्या सत्यप्रती जोडण्यात याव्यात. पोटनियम (७) अन्वये ज्यांच्यासाठी पदे राखून ठेवण्यात आली असतील अशा मागास जमातीच्या निरनिराळ्या गटातील उमेदवाराशिवाय इतर उमेदवारांनी त्यांच्या अर्जात त्यांच्या जाती नमूद करण्याची आवश्यकता असणार नाही.

१७. उपरोक्त नियमाचे अवलोकन केल्यास असे दिसून येते की, हा नियम प्रत्येक पात्र उमेदवारास खाजगी शाळेतील कोणत्याही शिक्षक किंवा शिक्षकेत्तर पदाच्या जागेसाठी अर्ज करण्याचा अधिकार देतो. सदरचा अधिकार अर्थपूर्ण आणि प्रभावी करण्यासाठी सदर शाळेमध्ये रिक्त पदे उपलब्ध आहेत, ह्या वस्तुस्थितीला विस्तृत प्रसिद्धी देण्यासाठी व्यवस्थापनामध्ये तत्सम कर्तव्य विचारात घ्यावयास पाहिजे जेणेकरून, अर्ज करण्यासाठी पात्र असणाऱ्या प्रत्येक उमेदवारास रिक्त पदांच्या अस्तित्वाची माहिती प्राप्त होऊन, तो त्या पदाकरिता अर्ज करू शकेल. व्यवस्थापनास रित्त असलेल्या जागेची माहिती कळविल्याशिवाय नियम ९ च्या पोटनियम ३ अन्वये प्रत्येक पात्र उमेदवारास दिलेला अर्ज करण्याचा अधिकार हा अर्थहीन ठरेल. पुढे असेही निदर्शनास येते की, राज्य सरकारकडून अनेक खाजगी शाळांनाही सहायक अनुदान मिळते आणि त्यामुळे शाळांमधील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन हे सार्वजनिक निधीतूनच अदा केले जाते आणि त्यामुळेच भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १४ च्या तरतुदींचा विचार करून, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे वेतन हे सार्वजनिक निधीतून अदा केले जात असल्याने, रिक्त पदाची जाहिरात करणे व्यवस्थापनावर बंधनकारक असेल. जोवर मागासवर्गीयांसाठी राखीव असलेल्या रिक्त पदांचा संबंध आहे, तोवर नियम ९ च्या पोटनियम ८ मध्ये एक विशिष्ट तरतूद आहे. नियम ९ चे पोटनियम ८ हे पुढीलप्रमाणे वाचावे.

नियम ९ चा पोटनियम (८) - पोटनियम (७) अन्वये राखीव म्हणून ठेवण्यात

आलेल्या रिक्त जागा भरण्याच्या प्रयोजनासाठी व्यवस्थापक वर्ग त्या प्रदेशात भरपूर खप असलेल्या निदान एखाद्या तरी वर्तमानपत्रात त्या रिकाम्या जागाबाबत जाहिरात देईल. तसेच, या रिकाम्या जागाबाबत जिल्ह्याचे सेवायोजन कार्यालय, जिल्हा समाजकल्याणचे अधिकारी व मागासवर्गीय व्यक्तींच्या या नियमाच्या प्रयोजनार्थ शासनाने मान्यता दिलेल्या कोणत्याही संघटना यांना त्या रिकाम्या जागा कळविल व जर त्यांच्याकडे अर्हताप्राप्त उमेदवाराची नावे नोंदवण्यात आली असतील, तर त्यांना ती नावे पाठविण्याबाबत कळविल. जाहिरातीला प्रतिसाद देऊन ज्या उमेदवारांनी अर्ज केले असतील, त्या उमेदवारांमधून किंवा सेवायोजन कार्यालयाकडून किंवा जिल्हा समाजकल्याण अधिकाऱ्यांकडून किंवा वर उल्लेखिलेल्या संघटनांकडून ज्यांच्या नावाची शिफारस करण्यात आली आहे असे कोणी उमेदवार असल्यास, त्यांच्यामधून कोणतेही राखीव पद भरणे शक्य झाले शक्य झाले नाही अथवा सेवायोजन कार्यालयाकडून किंवा जिल्हा समाजकल्याण अधिकाऱ्यांकडून किंवा वर उल्लेखिलेल्या संघटनांकडून एका महिन्याच्या मुदतीत अशा नावाची शिफारस करण्यात आली नाही तर, पोटनियम (९) च्या तरतुदीनुसार राखीव पदे भरण्याची कार्यवाही व्यवस्थापक वर्ग करू शकेल.

जोवर राखीव रिक्त पदांचा संबंध आहे, अशाप्रकारे, व्यवस्थापनाने केवळ किमान एका

वर्तमानपत्रात जाहिरात देणे बंधनकारक नाही तर विविध अभिकरणास रिक्त जागांबाबत सूचित करणे देखील बंधनकारक आहे. आमच्या मते, जरी कायद्यामध्ये किंवा नियमांमध्ये स्पष्ट तरतूद असली तरी, जाहिरात न देता व्यवस्थापनास पदे भरण्याची परवानगी देणे हे कायद्याच्या आणि नियमांच्या योजनेच्या विरोधात असेल. आम्ही वर उद्धृत केलेल्या अनुसूचि “एफ” मधील तरतुदीमध्ये, ज्याची तरतूद केलेली आहे त्याला प्राधान्य आहे. प्राधान्य याचा अर्थ विचारात घेण्याचा विशेष अधिकार असा होत नाही. याचा अर्थ इतर बाबी समान असतानाही प्राधान्याचा हक्क देणे होय. शेरसिंग वि. युनियन ऑफ इंडिया आणि इतर, ए आय आर १९८४ एस सी २०० या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निकालात नोंदविलेली निरीक्षणे ही आमच्या मते मोटार वाहन कायद्याच्या कलम ४७ च्या तरतुदींच्या संदर्भात संबंधित आहेत. ते पुढीलप्रमाणे वाचले जातात.

> “प्रस्तुत परिस्थितीला हे जरूर ते फेरफार करून लागू होईल. परंतु कलम ४७ अन्वये स्टेज कॅरेज परमिटच्या अर्जाचा विचार करताना हे स्पष्ट केले पाहिजे की, खाजगी चालक यालासुद्धा जर त्याने उपक्रम कार्यक्षमतेने आणि स्वस्त सेवा पुरविण्यास असमर्थ आहे हे दर्शविल्यास किंवा खाजगी चालकाकडे सदरची सेवा पुरविण्यासाठी जास्त चांगली यंत्र सामग्री आहे हे दर्शविल्यास, आंतरराज्य मार्गावर परमिट मिळण्याची बरोबरीने संधी असते. यासंदर्भात पसंती/ पसंतीक्रम याचा अर्थ असा होईल की, इतर बाबी ज्या गणितीयदृष्ट्या

<u>अचूक नाहीत पण सर्वसाधारणपणे गुणात्मक आणि संख्यात्मकदृष्ट्या समान असल्याचे दिसून येते, वैधानिक तरतुदीमुळे तराजू हा हमीच्या बाजूने झुकेल.</u> कलम ४७ (१-एच) यामध्ये नमूद असलेली तरतूद वरील चौकटीमधून बघितल्यास ती कायद्यासमोर समानता नाकारत नाही आणि म्हणून सदर तरतूद अनुच्छेद १४ चे उल्लंघन करत नाही. (यावर भर दिला.)

१८. जोवर नीता दनाने प्रकरणातील विद्वान एकल न्यायाधीश यांनी पारित केलेल्या निकालाचा संबंध आहे, त्या प्रकरणात हा मुद्दा विचारात घेतला जात नव्हता. त्या निकालातील परिच्छेद १३ हा संबंधित आहे. तो खालीलप्रमाणे वाचला जातो.

१३. नियुक्तीच ही वैध नव्हती कारण ती नियम ९ अनुसार नव्हती हा उत्तरवादी यांच्या वतीने उपस्थित विद्वान वकिलांचा युक्तिवाद लेखी निवेदनात मांडण्यात आला नाही. हे दर्शवणारी अशी कोणतीही बाब नव्हती की नियुक्ती वैध नव्हती. विद्वान वकिलाने दिनांक १३/९/१९९३ आणि १८/९/१९९३ च्या याचिकाकर्त्यांच्या अर्जांचा संदर्भ नियुक्ती आदेशामध्ये असल्याचे निदर्शनास आणून देऊन त्याच्या निवेदनाचे समर्थन करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर त्याने असे निदर्शनास आणले की, याचिकेच्या परिच्छेद ३ मध्ये याचिकाकर्तीने असे म्हणणे सादर केले आहे की, जेव्हा प्रतिवादी हे अर्हताप्राप्त ग्रंथपालाची नियुक्ती करणार आहेत, असे जेव्हा तिला समजले तेव्हा तिने सदर पदासाठी अर्ज केला होता. माझ्या मते, जर नियुक्तीच अवैध

होती असे उत्तरवादींचे प्रकरण असेल तर, उत्तरवादींनी त्यांच्या लेखी निवेदनात तशी विनंती करणे आवश्यक होते. याबाबत, लेखी निवेदनात कुठेही नमूद नव्हते. म्हणूनच, माझ्या मते, उत्तरवादी तर्फे उपस्थित विद्वान वकिलांचे हे म्हणणे हे मागाहून सुचलेले विचार आहेत आणि जे स्वीकारले जाऊ शकत नाही. खरंतर, जर नियुक्ती अवैध असती तर उत्तरवादींनी त्यांच्या लेखी निवेदनातून असा युक्तिवाद नक्कीच उपस्थित केला असता. याशिवाय, नियम ९(८) मध्ये अशी तरतूद केली आहे की, राखीव पदाची जाहिरात करणे आवश्यक आहे. तथापि, खुल्या प्रवर्गातील पदाच्या जसे की, ग्रंथपालाचे पद यासाठीच्या पदासाठी जाहिरातीची अशी कोणतीही आवश्यकता नाही. नियम ९(३) मध्ये केवळ शैक्षणिक आणि व्यावसायिक पात्रता, अनुभव इत्यादींच्या संदर्भात आवश्यक तपशीलांसह उमेदवाराने केलेल्या अर्जाबाबत तरतूद आहे. याचिकाकर्तीने ग्रंथपाल या पदासाठी अर्ज केला होता, जे राखीव पद नाही कारण नियम ९(३) अंतर्गत विहित केल्यानुसार ते एकाकी पद आहे. त्यामुळे उत्तरवादी यांच्या वतीने उपस्थित वकिलांचा युक्तिवाद हा न टिकण्याजोगा आहे.

१९. वर उद्धृत परिच्छेदाचे अवलोकन केल्यावर असे दिसून येते की, विद्वान एकल न्यायाधीश यांनी ही निरीक्षणे नोंदवण्यापूर्वी कायद्याच्या योजनेचा विचार केला नाही. ही केवळ पारित केलेली निरीक्षणे आहेत आणि सदर मुद्द्यावर चर्चा झालेली नाही आणि

निर्णयही झालेला नाही.

२०. आमच्या मते, म्हणून ज्या प्रश्नांचा संदर्भ दिलेला आहे त्यांची उत्तरे अशी द्यावी लागतील, ती पुढीलप्रमाणे :

१) दिनांक १५ एप्रिल, १९९१ चा शासन निर्णय हा मान्यताप्राप्त खाजगी शाळांमधील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना लागू केला जाऊ शकत नाही, जो एम.ई.पी.एस कायदा आणि त्याअंतर्गत तयार केलेल्या नियमांच्या तरतुदींद्वारे नियमन केलेला आहे.

२) एम.ई.पी.एस नियमांच्या अनुसूची "एफ" मध्ये कनिष्ठ लिपिक पदावर पदोन्नतीची तरतूद नाही. हे केवळ कनिष्ठ लिपीक आणि प्रयोगशाळा सहाय्यक या पदांवर नियुक्ती करताना निम्न श्रेणीतील कर्मचाऱ्यांना प्राधान्य देण्याची तरतूद करते.

(न्या. डी. के. देशमुख)

(न्या. अनुप व्ही. मोहता)

(न्या. रणजित मोरे)

**x-x-x-x**

**<u>अस्वीकरण</u>**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

**x-x-x-x**